
साहित्य प्रतिष्ठान
डरकाळी..
गणेश पावले

# डरकाळी

## गणेश पावले

ई साहित्य प्रतिष्ठान

पुस्तकाचे नांव: डरकाळी

प्रकार : कविता

कवी : गणेश पावले

Phone : 9619943637

ebookdarkali@gmail.com


मुखपृष्ठ. अंतर्गत सजावट : Last Bench Designs

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान®

esahity@gmail.com www.esahity.com

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.
- या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क कवीकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे  पुनर्मुद्रण किंवा नाटक. सिनेमा. सिरियल. स्टेज शो किंवा तत्सम रुपांतर किंवा भाषांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे.

©esahity Pratishthan® 2012



ई साहित्य प्रतिष्ठान ही कवी, लेखक व वाचकांनी मिळून चालवलेली चळवळ आहे. नवीन उदयोन्मुख लेखकांसाठी हे व्यासपीठ आहे, आणि खेडोपाडी व देशोदेशी पसरलेल्या मराठी वाचकांसाठी वाचनाचे साधन आहे. ई पुस्तके. आता स्मार्टफ़ोनवर डाऊनलोड करून वाचता येतात. आपण या चळवळीला हातभार लावू शकता. आपल्या ओळखीच्या लोकांचे ई मेल पत्ते पाठवा. त्यांनाही विनामूल्य ई पुस्तके पाठवू.

# 'डरकाळी'

वाघासारखी डरकाळी द्यायला नुसतं वाघ असून चालत नाही
त्यासाठी अंगात शिवाचा अंश असावा लागतो,
रणांगणात उतरून नुसती हाताची मुठ वळवून चालत नाही
त्यासाठी आई भवानीचा आशीर्वाद असावा लागतो,
अरे लढाया खुल्या मैदानात असोत किंवा खवळलेल्या सागरात
जिंकण्यासाठी सह्याद्रीसारखा कणा ताठ असावा लागतो,
स्वराज्य उभं करायचं म्हणजे खायचं काम नाय
त्यासाठी रक्ताचा अभिषेक करावा लागतो,
लढणं म्हणजे नुसतं प्राण तळहातावर घेवून चालणं न्हवे
त्यासाठी शत्रू सोडाच त्याच्या घोड्यालाही पाण्यात दिसावं लागत,
आग्राहून सुटका, आणि शास्तेखानाची फजिती, अहो राजा होण्यासाठी
अफजाल्यासारख्या पाप्याला वाघासारख फाडावं लागतं,
वाघाच्या घुरघुरण्याला डरकाळीचं महत्व यायला
माझ्या राजांसारखं..

रयतेचा वाली छत्रपती शिवाजी राजे भोसले असावं लागतं,

साहित्य प्रतिष्ठान®

# !! अर्पणपत्रिका !!

**माझं हे पहिलं वहीलं ई पुस्तक शिव शंभू चरणी अर्पण...**





## दोन शब्द...

अफाट सागर जसा ओंजळीत मावणार नाहीत, पण काही थेंब मात्र नक्कीच मावतील. पक्षाने कितीही उंच भरारी घेतली तरी गगनभेदी ठरणार नाही. तसच शिवरायांचं कर्तृत्व त्यांचे पराक्रम कितीही शब्दात बांधायचे प्रयत्न केले तरी ते अपुरेच. मीही प्रयत्न केलाय. एक छोटासा प्रयत्न जो मी एक शिवकवी आहे याची ओळख करून देणारा. ही युगपुरुषाची, रयतेच्या राजाची कीर्ती मी पुस्तकरूपात मोडक्या तोडक्या शब्दांत शिवापर्ण करतोय.

**जय शिवराय !! जय शंभूराजे !!**

# कवी गणेश पावले यांची ओळख



कितीही लिहिला पराक्रम शब्दांत नाही मावणार पानांवर
तरी मी वेडा बंधन बांधायला चाललो अफाट सागरावर
किती तो मोठा पराक्रम, अटकेपार कीर्ती माझ्या राजांची
गणेश लिहितो, लिहितच राहतो, कृपा शिवरायांची

तसं सांगण्यासारखं काहीच नाहीय. माझी ओळख म्हणजे माझे शिवराय. कारण त्यांच्याच कर्तुत्वाच्या चार ओळी मी लिहितो. त्यांच्याच पराक्रमाच्या अफाट सागरातला मी एक थेंब. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वैभववाडी तालुक्यात भुईबावडा हे माझं गाव, माझं जन्मस्थळ माझं सर्वस्व. ज्या गावाने मला घडवलं, शिकवलं. शाळेच्याच बाजूला गावात मध्यवर्ती ठिकाणीच शिवरायांचा पुतळा आहे. त्यामुळे अगदी लहानपणापासून मनावर पडलेला त्यांचा प्रभाव. तिसरी, चौथीत असताना अफजल्याचा वध, शाहिस्तेखानची फजिती, पुरंदरचा तह, आग्र्याहून सुटका हे सर्व एक गोष्ट म्हणून मी वाचलेलं. इतर विषयात जरी ढबू असलो तरी, या इतिहासाच्या विषयात मात्र मी पैकीच्या पैकी मार्क पाडायचो. पुढच्या शिक्षणात आठवी, नववी, दहावी अस शिक्षण घेताना राजांचे विषय कधी आलेच नाहीत. पण लहानपणापासून शिवाजी नावाचं वादळ मनात भिनलं होत. त्यांच्याबद्दल समाजात असलेली आपुलकी आणि जयघोषात असणारा समावेश. शिवाजी कोणीतरी देव माणूस असावा म्हणून हे सर्व त्यांचे गुणगान गातात. गावात शिवजयंती व्हायची तेंव्हा पाहिलेले, सर्वांच्या मनामनातील शिवराय, आणि शाळेतून जाणारी सहल प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी आणि माझ्या गावाच्या पूर्वेला असणारा गगनगड हे किल्ले पाहिलेले यामुळे शिवराय अगदी हृदयात भिनून राहिले.

गावचं शिक्षण संपवून मुंबईला आलो. इकडेच एका कंपनींत कामाला राहिलो आणि नव नवीन मित्रांबरोबर ओळख झाली. इंटरनेटच्या माध्यमातून मित्र मिळाले. ज्यांनी मला या लिखाणाच्या प्रवाहात ओढले. लिखाणाची आवड होती पण कधी पेन हातात घेतलाच न्हवता. शिवरायांचे गुणगान लिहायला सळसळणार रक्त आणि प्रखर तेजाची लेखणी लागते आणि ती माझ्या हातात आली ती माझ्या मित्रांच्या प्रोत्साहानेच. मी आज माझ पाहिलं ई-पुस्तक आपल्यासमोर आणतोय. ते नितीन पाटोळे, अजित राणे. संतोष हसुरकर, प्रशांत चव्हाण, प्रणय शेलार असे दुर्गवेडे, दुर्गवीर मित्र लाभले. तसेच टीम मित्रमराठी आणि मला नेहमीच उत्साहित

ठेवणारे माझे दादा किशोर मोरे यांचे साह्य. आणि विनिता कोहिनकर यांच्या मदतीनेच हे पुस्तक. मी आपल्यासमोर आणतोय.

शिवराय म्हटलं की , काव्य लिहिताना डोळयांत वेगळीच चमक येते. त्यांचा पराक्रम, त्यांची कीर्ती, नीती आणि बाणेदारपणा मी माझ्या रक्तात, नसानसांत कितीतरी वेळा धावतानाचा भास होतो. लेखन करताना छत्रपती शिवराय, शंभूराजे डोळयांसमोर उभे ठाकतात. शिवकाव्य लिहितानाची जी वेळ असते तो प्रसंग, तो काळ आयुष्यातील संस्मरणीय क्षण असतो. सुखाचा आणि लेखनाचा परमोच्च बिंदू असतो. आणि हे शिवकाव्य लिहिताना वेळोवेळी मी तो गाठलाय याचं मला समाधान वाटत.

शिवचरण वंदिता छाती स्फुरते अभिमानाने
सह्याद्रीच्या कड्याकपारीत पाय चालती त्वेषाने...
लिहिता.. लिहिता.. 'जय शिवराय' लिहिले माझ्या लेखणीने
गणेश धन्य होतो शिवकाव्यांच्या संगतीने...

माझं हे शिवकाव्य 'डरकाळी' माझ्या आयुष्यातील एक महत्वाचा टप्पा आहे.
आणि हे शक्य झालं ते ई- साहित्य प्रतिष्ठान मुळेच. त्यांनी हे पुस्तक प्रकाशित करण्यास मदत केली ती अमर्याद आहे. त्यामुळे मी ई- साहित्य प्रतिष्ठानचा नेहमीच ऋणी राहीन. माझ्यासारखे अनेक नवकवी आणि लेखक यांना आपल्या सर्वांसमोर आणायचं महान कार्य ई- साहित्य प्रतिष्ठान करतेय. नवकवींना जगासमोर एक खुल्लं व्यासपीठ दिले. हे  ई- साहित्य प्रतिष्ठान ने दिलेलं मायमराठीसाठी खूप मोठे योगदान आहे. मी ई- साहित्य प्रतिष्ठानचा शतश: आभारी आहे.

आपला

गणेश तुकाराम पावले

संपर्कासाठी

Phone : 9619943637

ebookdarkali@gmail.com



## चवताळला वाघ सह्याद्रीचा, अवतार जणू नरसिंहाचा

कोथळा काढीला उभा चिरुन
षंढा लोळवला धरणीला,
षंढच म्हणेल पाप्यास गणेश हा
त्रासवले त्याने रयतेला |

पाहुन अघोर जुलमास
हर हर महादेव वदला मुखी,
चवताळला वाघ सह्याद्रीचा
घेण्या बदला वाघनखी |

नरसिंहाचा अवतार जणु
फाडीला ऊर, उपसला कोथळा,
तोफेचा आवाज होताच
खवळला मर्द मावळा |

हादरला यवन म्हणे 'हा नरसिंह'
अफजल्या गेला लयाला,
सह्याद्रीचा वाघ गरजला
कापरं सुटलं यवनाला |

गणेश हा मुजरा करीतो
शिर झुकवुन चरणाला,
घ्या अवतार पुन्हा राजे
संहारण्या दुष्ट पाप्याला |

साहित्य प्रतिष्ठान®

# मर्द मावळा

स्वराज्यासाठी उभा ठाकला
स्वराज्याच्या घेवून शपथेला
सिंहाच्या ताकतीने लढला,
धूळ चारून गनिमांस
वाघनखांनी उभा फाडीला |
"हर हर महादेव" मुखी वदला
टिळा मातीचा कपाळी लावला,
यवन चार पावलं मागं फिरला
मर्द मावळा रणी उतरला |
कधी ना हरला, मागे ना सरला ,
त्वेषाने लढला, ना मरणाला भ्याला,
गरजला सह्याद्रीत असा
मोघलांच्या घोड्यांना पाण्यातही दिसला |
मर्द मावळा विजयी जाहला
भगवा नभी डौलात फडकला,
भगव्यासहित मराठ्यांचा थाट वेगळा
असा मराठा मर्द मावळा |



# राजं... राजं ....राजं ...

राजं, जिथ पाहतो
तिथं तुम्हीच दिसतां,
राजं, अस वाटत या डोळ्यांना
तुम्हालाच पाहण्याचा छंद लागलाय...

राजं, जिथं मी जातो
तिथं तुमचंच गुण गातो,
राजं, असं वाटतं,
या जिव्हेनं फक्त आणि फक्त
तुमचाच पराक्रम गायलाय...

राजं, जिथं जातो
तिथं तुमचीच कीर्ती ऐकतो,
राजं, असं वाटत की
या कानांना फक्त आणि फक्त
तुमचाच जयघोष आवडतो...

राजं, जिथं जातो तिथं
तुमच्याच ध्यानात रमतो,
राजं, अस वाटत की
या मनाला फक्त आणि फक्त
तुमचाच ध्यास लागलाय...

राजं, जेंव्हा मी गडकोटांवर जातो
तेंव्हा तुमचा मावळा व्हावसं वाटतं,
राजं, अस वाटत की
या जीवाला फक्त आणि फक्त
तुमच्यासाठीच मरायचा छंद लागलाय...

राजं, तुमच्या संगतीत रमावं
तुमच्या संगतीत लढावं
तुमच्या संगतीत जिंकावं
राजं, असं वाटत की
या जीवाला तुमच्याच सवंगड्यांतलाच
एक मावळा व्हावं...

साहित्य प्रतिष्ठान®

# शिपाई भगव्या झेंड्याचा

जन्मापासून आम्हा
भगवा असे प्यारा
तेच आमच निशाण
आमचा सहारा
बाळकडू आमचं
रणांगणाच वारं
पेटून उठतो आम्ही
चमकते तलवारीची धार
पाठीमागून वार नको
अंगात शिवतेजाची आग
भगाव्यासहित शोभून दिसतो
मर्द मराठी वाघ

# शिवसूत्र

घाबरलोच कधी मनात
तर आम्ही शिवरायांचं नाव घेतो
हर हर महादेव गर्जून
पुढचं पावूल पुढंच टाकतो
हत्तीच बळ येतं बाहूत तेंव्हा
शत्रूही पळत सुटतो
पाठीमागून वार करणाराही
चरा चरा कापतो
जेंव्हा मराठा
"शिवसूत्र" वापरतो



# शपथ मराठीची मराठ्यांना

भ्रष्टाचार उखडून काढू
लाचारी आमच्या रक्तात नाय,
घाम गाळतो, तिथे मोती पिकवतो
फुकट कुणाचं कधी खात नाय,
आमच्याच कमाईवर मिरवतायत सगळे
हेच आम्हा समजत नाय,
शपथ आहे एकच मराठ्यांना आपल्या मराठीची
भ्रष्टाचाराची पाळे छाटल्याशिवाय
ताट मानेने जगायचं नाय...

## आम्ही मराठी ...

लाख तोडिल्या ढाली
तळपत्या तलवारीच्या पात्यांनी
धडावेगळे केले गनिमांना
टोकदार भाल्यांनी
प्राणही अर्पिले प्रसंगी
मराठमोळया स्वराज्यासाठी
झुकत नाही कधी
ताठ मानेने जगतो
"आम्ही मराठी"

# शांत बसेल तो मराठा कसला

आमचा नाद करणारा शत्रूही
कधी कधी आम्हाला पूज्य असतो,
तोही तितकाच जहाल आणि खंबीर वाटतो
पण आम्हीच मात्र पुरून उरतो,
अफजल्याचं थडगं सारं काही सांगून जातं,
मराठ्याचं काळीजही कधी कधी पाझरतं,
बहलोलला विचार मराठा किती दिलदार आहे,
जो विश्वासघातकी निघाला
त्याच शीर तलवारीच्या टोकावर आहे,
माज  उतरवायला रणांगणात उतरतो
शेवटी आमचाच जय ठरलेला आहे
'सदा विजयी भवं' असा
आई जीजाउंचा आशीर्वाद आहे,
अन्याय पाहता जुलमी
तळपायाची आग मस्तकात आहे
अहो,शांत बसेल तो मराठा कसला
 चिरून टाकील उभ्या उभ्या
बाहेर अफजुल्याचा कोथळा आहे,

जगदंबेचा आशीर्वाद आम्हावर
जीजाउंचा पाठीवर हात आहे,
संगे मावळयांची साथ आहे
असंख्य अव्हाने पेलू आम्ही
उभा सह्याद्री आमचा पाठीराखा आहे,
आम्हावर पलटून वार नको
तलवारीची धार आमच्या
तुमच्या रक्तानेच लाल आहे,
परतून येताना हजारदा विचार करा
भडकलाच मराठा तर
बाकी फक्त वणव्यातली राख आहे,
**जयोस्तु मराठा..!!**



# मी एक दुर्गवीर

मी एक दुर्गवीर
मावळा शिव शंभूचा
त्यांच्या जाज्वल्य पराक्रमाचा
महाराष्ट्राच्या गौरवशाली
इतिहासाचा साक्षीदार

मी एक दुर्गवीर
सह्याद्रीच्या कड्या कपारींत फिरणारा
पडत्या बुरुजाला सावरणारा
रक्ताचं पाणी करून
नवनिर्माण करणारा

मी एक दुर्गवीर
काट्याकुट्यातून अनवाणी चालणारा
“जय शिवराय”चा जप करणारा
गडकोटातून हर हर महादेव गरजणारा
एक एक ढासळणारी वीट
रक्त आटवून पुन्हा जोडणारा

मी एक दुर्गवीर
दुर्गालाच आपला बाप मानणारा
काळ्या मातीला आपली आई म्हणणारा
आणि याच आई बाबांची सेवा
प्राणपणाने, निष्ठेने करणारा

मी एक दुर्गवीर
ढासळणारे बुरुज गडकोट
पुन्हा उभे करण्याची शपथ घेणारा
आणि याच शपथेसाठी रात्र रात्र जागणारा
स्वराज्यासाठी हळहळणारा
भगव्या छायेतच मरणाची स्वप्ने पाहणारा

मी एक दुर्गवीर
शिवशंभूचं स्वप्न सत्यात उतरवणारा
भगव्यासाठी प्रसंगी प्राणही देणारा
माय मराठीचा बाणा
अखंड तेवत ठेवणारा

मी एक दुर्गवीर
जय जय जय शिवराय एकच मंत्र जपणारा
तन मन धन अर्पूण गड कोटांसाठी झिजणारा
सह्यवेडा मी सह्याद्रीचा,
दुर्गवेडा मी दुर्गांचा,
मावळा शिव शंभूरायांचा ....



# मराठा

झुकला तो संपला,
असाच आमचा बाणा |
झुंजून जिंकायचंच असेल,
तर फक्त "जय शिवराय" म्हणा |

हत्तीचं बळ येईल बाहुत,
"हर हर महादेव" गरजल्याने |
शत्रू ही चार पावले मागे सरेल,
हा मराठी बाणा पहिल्याने |

गरागरा फिरणारी तलवार,
वाराही तिला धजावतो |
मराठे रणांगणात उतरले की,
भल्या भल्यांना आपला बाप आठवतो |

मर्दुमकी गाजवली ती रणांगणात,
कुणाला मुजरा कधीच केला नाही |
सरदारकी, जहागिरी धुडकावली,
पण मराठ्याने मान कधी झुकवली नाही |

साहित्य प्रतिष्ठान®

# मराठ्यांची पोरं ...

अन्याय आणि अत्याचाराविरुद्ध
जर का कुठे ठिणगी पेटली
तर ती मराठ्यांचीच असेल,
अरे, वाघाची जात आमची
त्यात सुद्धा विजय आमचाच असेल,
कोण म्हणतो मराठयांचं पानिपत झालं
पानिपत तर आम्हीच त्यांचं केल
मरण पत्करलं पण लढूनच
आणि त्यानंतर तख्त राखलं तेही लढूनच,
अरे मराठ्यांची अजूनही बरोबरी
करणारा जन्माला आलाच नाही,
थाप नाही कुणाची आमच्या वाटेला जायची
कारण शिवरायांचा आम्हा आशीर्वाद आहे,
शंभूराजांचा बाणा हीच आमची जान आहे,
आम्हाला पाहताच शत्रूच्या छातीत धडकी आहे
कारण "मराठ्यांची पोरं" अशीच आमची ओळख आहे,



## रायगड दर्शनाने मनात आलेले शब्द...

हे शिवराया,
आज नयन माझे सुखावले तुझं राऊळ पाहून
रायगडाच्या शिवराजा तुला मुजरा स्मरून..

कीर्ती तुझी अफाट आज पाहिली डोळयांनी
कसा स्वर्ग नटलेला सह्याद्री डोंगरदऱ्यांनी...

तेज तुझे पाहून शीर झुकले चरणाशी
काय गुण वर्णू सह्याद्रीचे टिळा लाविला लल्लाटी..

हे शिवराया, शिवतेजा, राजे शोभता आम्हासी
आज धन्य झाला गणेश जव कवटाळले तव चरणाशी...

# आम्ही मराठे [नाद करायचा नाय]

नाद आमचा केला तर
चारू सह्याद्रीची माती,
अरे शतकोन शतके पेटतायत
येथे मराठी पराक्रमाच्या वाती,
नजरेतला अंगार आजही जाळतो शत्रूला,
अरे विचारा जावून त्या औरंग्याच्या कबरीला,
अजूनही पाण्यात त्यांच्या घोड्यांना मराठे दिसतात,
सह्याद्रीच्या काड्यांतून फक्त वारा आणि मराठेच फिरतात,
रोहीरेश्वराच्या मंदिरात आजही अभिषेक होतायत,
स्वराज्यासाठी मराठे आजही शपथ घेतायत,
साखळदंडात कैद केलेल्या माझ्या
वाघाच्या छाव्यासमोर
औरंग्यानही गुडघे टेकले,
शेर शिवा का छावा हैं ये संभाजी
असेच त्याचे ओठ पुटपुटले,
जयोस्तु मराठा.

!! जय शिवराय.!!



## शिवा काशीद

हुबेहूब राजाच तो, राजांचा आरसाच तो,
जिंकली मर्दाने मने मराठ्यांची
बलिदानाची मिसाल तो,
प्राण स्वत:चा द्यायला तयार झाला
शूर शिवबाचा मावळा तो,
अरे माहित आहे प्राण जाणार
पण रयतेच्या पोशिंद्यासाठी मी मरणार

## साक्ष सह्याद्रीची

सह्याद्रीचे कडे देतात साक्ष
आमच्या पराक्रमाची |
इथेच पिल्ले दाखवली
यवनांना दिवसा सूर्याची |
आहे का हिंमत कुणात
नजरेला नजर द्यायची |
आठवा! इथेच छाती फाडली
शंभू राजांनी वाघाची |

साहित्य प्रतिष्ठान®

# मराठ्यांचा शिवबा आज छत्रपति जाहला

आई जीजावूंच्या डोळयांत आनंदाश्रू ढळला,
मराठ्यांचा शिवबा आज छत्रपति जाहला.

अवघा सह्याद्री आज कृथार्थ जाहला,
हर हर महादेवचा नाद दुमदुमला,
स्वराज्यासाठी राजा उभा ठाकला,
मराठ्यांचा शिवबा आज छत्रपति जाहला.

बाजी, तानाजी, शिवा काशीद आठवला,
जाणता राजा माझा मनात हळहळला,
३२ मनी सिंहासनात, हिऱ्यामाणकांत शोभला,
मराठ्यांचा शिवबा आज छत्रपति जाहला.



सिंहासनाधीश्वराचा अभिषेक जाह्ला,

मराठ्यांच्या छातीचा भाता गर्वानं फुगला,

भगवा झेंडा डौलात आसमानी झळाळला,

मराठ्यांचा शिवबा आज छत्रपति जाह्ला.

आई जीजावूंच्या डोळयांत आनंदाश्रू ढळला,

मराठ्यांचा शिवबा आज छत्रपति जाह्ला.

साहित्य प्रतिष्ठान®

# ॥ ई साहित्य प्रतिष्ठानची विनंती ॥

"डरकाळी" हे पुस्तक कसं वाटलं मित्रांनो. आवडलं? आवडणारच.  कारण मराठी भाषेची सारी ताकद गणेशच्या शब्दांत एकवटली आहे.  महाराजांच्या पराक्रमाची महती आहे ही. ती सुद्धा मराठीतून.

मराठी म्हणजे अमृताशी पैजा जिंकेल अशी गोड भाषा. मराठी म्हणजे कोल्हापुरी लवंगी मिरचीचा तिखटपणा. मराठी म्हणजे औरंगजेबाच्या बापालाही सर न करता आलेला किल्ला. मराठी म्हणजे दलितांचा हुंकार. मराठी म्हणजे स्त्रीयांच्या शिक्षणाचा श्रीगणेशा. मराठी म्हणजे टिळक आणि आगरकर. मराठी म्हणजे फुले आणि सावरकर. मराठी म्हणजे तुकोबा आणि ज्ञानेश्वर. मराठी म्हणजे डांगे आणि आंबेडकर. मराठी म्हणजे ठाकरे आणि तेंडुलकर. २३०० वर्षं वापरली जाणारी भाषा मराठी. बारा कोटी जनांची भाषा मराठी. समृद्ध साहित्याची भाषा मराठी.

आणि काय ही आज मराठीची दूरवस्था! आज खुद्द महाराष्ट्रात दोन मराठी माणसेसुद्धा एकमेकांशी मराठीत बोलत नाहीत. महाराष्ट्रात दुकानांवर मराठी बोर्ड असावेत म्हणून "खळळ खट्टाक" करावे लागते. मराठी कवी लेखकांची मुलं इंग्रजी माध्यमात शिकतात. त्यांना मराठी बोलायला लाज वाटते. मराठी शाळा ओस आणि बंद पडतात.



अशा वेळी मराठीचा डंका महाराष्ट्रात, नव्हे भारतात, नव्हे तर जगभरात गजबजेल अशी स्वप्नं आम्ही पहातो. आमच्यासारखे अनेक लोक पहातात. २३०० वर्षांचा इतिहास असलेल्या या अमृतवाणी मराठी साहित्याचं सुवर्णयुग येईल अशी खात्री आम्ही बाळगतो. कारण मराठीत समृद्ध साहित्य आहे. कारण मराठी माणसांकडे बुद्धीमत्ता आहे. कारण मराठी माणसांकडे प्रतिभा आहे. कारण मराठी नवीन साहित्यिक आणि नवीन वाचकवर्ग उभा होताना आम्ही पहातो आहोत. बारा कोटी मराठी माणसांच्या या भाषेला अमरत्त्व आहेच आहे याची आम्हाला शंभर टक्के खात्री आहे. म्हणून आम्ही बारा लाख मराठी लेखक वाचकांचं नेटवर्क उभं करण्यासाठी झटत असतो. दर आठवड्याला नवनवीन ई पुस्तकं दीड लाख लोकांना विनामूल्य पाठवत असतो. आजवर अशी तिनशे पुस्तकं आम्ही प्रकाशित केली आहेत.

हा यज्ञ दिवसेंदिवस मोठे रूप घेतो आहे. आणि त्यात हजारो हातांचं योगदान येत आहे. नवीन ताज्या दमाचे लेखक पुढे येत आहेत. अनुभवी ज्येष्ठ लेखक येत आहेत. हजारो लोक, रोज, कुणी आठ, कुणी दहा, कुणी शंभर, मेल आय डींचं योगदान देत आहेत. तुम्हीही तुमच्या ओळखीच्या शक्य तेवढ्या मराठी लोकांचे ई मेल आय डी आम्हाला पाठवा. त्यांना दर आठवड्याला विनामूल्य ई पुस्तकं पाठवली जातील. मराठी माणूस भले पैशात मागे असेल, पण वाचनात इतर लोकांपेक्षा नक्की पुढे आहे. लक्षात ठेवा! आज ना उद्या ही गोगल गाय वाटणारी भाषा ढाण्या वाघाचं स्वरूप धारण करील. करीलच!

सर्वांची साथ हवी यार! कृपया आपल्या किमान आठ आप्त मित्रांच्या मेल आय डी esahity@gmail.com या पत्त्यावर कळवा आणि त्यांनाही या महायज्ञात सामिल करा. त्यांना आम्ही नवनवीन मराठी पुस्तकं विनामूल्य पाठवू. दर आठवड्याला. वेगवेगळे विषय.

मनापासून धन्यवाद !

आपले विश्वासू

टीम ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

साहित्य प्रतिष्ठान®

महाराष्ट्राचं वैभव म्हणजे किल्ले. आणि मराठी भाषा.

पण आज जी मराठीची अवस्था त्याहून वाईट त्या किल्ल्यांची.

सोनं भंगारात टाकणारे आम्ही करंटे आहोत.

पण सारेच नाही.

याच महाराष्ट्रात असे अनेक गडप्रेमी आहेत जे किल्ल्यांची डागडुजी आणि सफ़ाई करून त्यांत पुनः चैतन्य आणण्याचं काम करत आहेत. स्वयंसेवी. स्वखर्चाने. स्वबळावर.

ई साहित्य प्रतिष्ठान अशा प्रयत्नांवर एक पुस्तिका काढून यांची माहिती देण्याची योजना आखते आहे.

आपल्या ओळखीचे असे काही गट, संस्था किंवा व्यक्ती असल्यास त्यांच्या प्रयत्नांची माहिती फ़ोटोंसह पाठवावी ही विनंती.

आमचा पत्ता : esahity@gmail.com

धन्यवाद

टीम ई साहित्य प्रतिष्ठान

